## महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/322/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 11/09/2024

---

# 1)घरफोडी :-

**इतवारा :-** दिनांक 06.09.2024 रोजी 20.00 वा. ते दिनांक 10.09.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी हैदरबाग, देगलूर नाका, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे कामानिमित्त बाहेर गावी गेले असता त्यांच्या घराचे मुख्य दरवाजाचे कडीकोंडा कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील बैठक हॉल, खालच्या व वरच्या मजल्यावरील बेडरूम मधील कपाट उघडुन त्यातील सामान अस्ताव्यस्त फेकुन त्यातील सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 6,17,000/-रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अब्दुल सलाम पि. अब्दुल गफार, वय 51 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. हैदरबाग, देगलूर नाका, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 343/2024 कलम 305,331(3),331(4) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रमेश गायकवाड, मो. नं. 9552574510** हे करीत आहेत.

# 2)चोरी :-

**1)नायगाव :-** दिनांक 09.09.2024 रोजी 21.00 वा. ते दिनांक 10.09.2024 रोजी 05.00 वा. चे दरम्यान, **मौजे मांजरम शिवारातील व्यंकटराव शेषराव मंगनाळे यांचे शेतातील माहादेव मंदीरात ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद ठिकाणी महादेव मंदीदातील मोकळया जागेत असलेले लोखंडी दानपेटी मधील अंदाजे 30,000/-रूपयाची रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने नेली. वगैरे **फिर्यादी सुभाष हावगीराव मंगनाळे, वय 58 वर्षे, व्यवसाय शेती रा. मांजरम ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 228/2024 कलम 305 भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री पंडीत, मो. नं. 9923184058** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :-** दिनांक 10.09.2024 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **इस्सार पेट्रोलपंप छत्रपती चौक, नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादी हि नेहमीप्रमाणे कटलरीच्या गाडयावर काम करताना तेथे दोन बाया आल्या व त्यातील एका पंजाबी ड्रेस वाल्या बाईने फिर्यादीचे नातीच्या गळयातील सोन्याचे ओम किंमती 7000/-रूपयाचे तोडुन हिसकावून चोरून नेत असताना फिर्यादीचे नातीने ओरडल्याने फिर्यादीचे लक्षात आल्याने फिर्यादीने जोर जोरात ओरडल्याने त्या दोन्ही बाया तेथुन कॅनल रोडकडे फिर्यादीचे नातीचे गळयातील सोन्याचे ओमचे पान हिसकावून पळुन गेल्या. वगैरे **फिर्यादी मिनाक्षी गोविंदवार वय 38 वर्षे, व्यवसाय कटलरी गाडा रा. छत्रपती चौक सुपर मार्केटच्या मागे शिवकांता अपार्टमेंट मागे, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 447/2024 कलम 304(2),3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1098 किडे, मो. नं. 9422615497** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :-

**धर्माबाद :-**दिनांक 09.09.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **तिवारी यांचे घरासमोर मोंढा धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादीस यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस घरी बोलून गच्चीवर नेवून माझ्या मुलीचा पाठलाग का करतोस म्हणुन आरोपीतांनी हातातील काठीने पायावर कमरेवर मारहाण करून गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करून लाथबुक्याने मारहाण केली व हातातील लोखंडी रॉडने मारहाण करून पाठीत मांडीवर मुक्कामार मारला व तु पुन्हा आमच्या मुलीला पाठलाग केलास तर तुला खतम करतो म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नरेश शंकर गुरजलवाड, वय 21 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. रत्नाळी ता. धर्माबाद जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 265/2024 कलम 118(2),115(2),352,351(2),(3),3(5) भारतीय न्याय संहीता-2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2006 मुस्तापुरे, मो. नं. 90296515874** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**वजिराबाद** :– दिनांक 05.03.2021 ते दिनांक 31.04.2024 रोजी दरम्यान, **जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभाग, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी यांना जल जीवन मिशन कार्यक्रम व पाणी टंचाई करीता एकुण 7,00,000/–रूपये अग्रीम स्वरूपात प्रदान केले असताना देखील त्यांनी त्यांचे समायोजन केले नाही तसेच त्यांना वेळोवेळी लेखी पत्र दिले असताना देखील त्यांनी उत्तर सादर केले नाही यावरून यातील नमुद आरोपी तत्कालीन उप अभियंता किनवट यांना शासनातर्फे वरिल शासकीय योजनेच्या खर्चा करीता दिलेली नमुद रक्कम शासकीय योजनांवर विहीत मुदतीत खर्च करून त्याचे समायोजन सादर न करता त्या शासकीय पैशाचा स्वतःचे फायदया करीता वापर करून शासकीय पैशाचा अपहार केला आहे. वगैरे **फिर्यादी अमोल शिवाजीराव पाटील, वय 41 वर्षे, व्यवसाय कार्यकार्य अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं. 451/2024 कलम 409 भारतीय दंड सहिता कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री किरवले, मो.नं. 9922101100** हे करीत आहेत.

## 5)खंडणी :–

**वजिराबाद** :–दिनांक 10.09.2024 रोजी 08.45 वा. चे सुमारास, **लंगर साहिब गुरूव्दारा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी नमुद ठिकाणी ट्रॅव्हल्स क्रं. एम.एच.–26/एन–9036 हि लावुन संगतचे लोक देवर्शनासाठी घेवुन जाणेसाठी ट्रॅव्हल्स मध्ये लोक बोलावून बसवत असताना तेथे हजर असलेले नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस देवदर्शनासाठी प्रवासी बसवायचे असल्यास तुला 1000/–रूपये महिना प्रमाणे हप्ता दयावा लागेल असे म्हणुन फिर्यादी सोबत वाद विवाद करून फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ केली व हप्ता नही दिया तो तुझे तलवार से छाट दुंगा असे म्हणुन तलवारीचे मुठीने फिर्यादीचे हातावर, मानेवर, भकाळीवर मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मंजितसिंग रूपसिंग रायके, वय 32 वर्षे, व्यवसाय चालक रा. चंदासिंग कार्नर तुप्पा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 452/2024 कलम 308(2),296,115,352,351(2),3(5) भा.न्या.सं–2023 सह कलम 4/5 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मंठाळे, मो.क्रं. 8237703777** हे करीत आहेत.

## 6)गुंगीकारक औषधीद्रव्य विक्री :–

**भाग्यनगर** :– दिनांक 10.09.2024 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **तरोडा नाका ते छत्रपती चौक जाणारे रोडवर दिपनगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या Nitrosun – 10 नावाची नशा निर्माण करणाऱ्या गोळया एकुण किंमती 11,200/–रूपयाच्या विक्री करण्यासाठी घेवून जाताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/818 प्रदीप संभाजी गर्दनमारे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 446/2024 कलम 22(बी) व 8 (सी) गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम 1985 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री देशमुख,** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)कंधार** :–दिनांक 09.09.2024 रोजी 23.10 वा. चे सुमारास, **मौजे मानसपुरी येथे रोड लगत, ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5100/–रूपये व पाच मोबाईल एकुण किंमती 28,000/–रूपयाचे असा एकुण 33,100/–रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2730 प्रकाश विठ्ठलराव ठाकरे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे कंधार** गुरनं 298/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो.नं. 9421849989** हे करीत आहेत.

**2)नायगाव** :–दिनांक 10.09.2024 रोजी 00.50 वा. चे सुमारास, **मौजे मांजरमवाडी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद तेरा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2700/–रूपये व मोबाईल एकुण किंमती 42,000/–रूपयाचे असा एकुण 44,700/–रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/312 बालाजी बळवंतराव शिंदे, ने. पोस्टे नायगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे नायगाव** गुरनं 227/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1133 पेदे, मो.नं. 8208999464** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)मनाठा** :– दिनांक 10.09.2024 रोजी 11.00 वा. चे सुमारास, **जिल्हा परिषद शाळा पिंगळी ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 4060/–रूपयाचा माल आपले ताब्यातील मोटार सायकल किंमती 50,000/–रूपयाची वर चोरटी विक्री करण्याचे उदेशाने वाहतुक करीत असताना आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2123 दत्तात्रय अत्रिनंदन गिरी, ने. पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 151/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2334 यादव,** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :—** दिनांक 10.09.2024 रोजी 17.15 वा. चे सुमारास, **कॉलेजची देवी बायपास रोडवर रेल्वे उड्डान पुला जवळ रोडवर मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी किंमती 2500/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1213 चंद्रशेखर केरबा मुंडे, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 195/2024 कलम 65(ई), मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2366 मुंडे,** हे करीत आहेत.

## 9)विद्युत शॉक लागुन मृत्यु :—

**कंधार :—** दिनांक 10.09.2024 रोजी 10.00 वा. चे सुमारास, **मौजे कुरूळा सरकारी दवाखाना ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे परमेश्वर बबनराव जाधव, वय 16 वर्षे, रा. मर्शिवनी ता. कंधार जि. नांदेड** हा त्याचे घरी लक्ष्मीच्या सणानिमित्त लक्ष्मीचा मकर करण्याकरीता लाईट जोडत असताना इलेक्ट्रिक शॉक लागल्यामुळे त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना कुरूळा येथे शरिक केले असता डॉक्टरांनी तपासुन मयत घोषित केले. वगैरे **खबर देणार योगेश शंकर जाधव, वय 20 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. मर्शिवनी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून आ. मृ. **50**/2024 कलम 194 भारतीय न्याय संहीता—2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो.नं. 9421761652** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड